


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७२६ . वा | मंगळवार | दि. ०२ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# विजयराज शिंदे यांची उमेदवारी म्हणजे भाजप कार्यकर्त्यांच्या भावनांचा स्फोट...

## बुलडाणा लोकसभा निवडणुकीत विजयराज शिंदेंचा विजयरथ धावणार

## हिंगोलीत होऊ शकते तर बुलढाण्यात का नाही होऊ शकत?

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील राजकारणात सोमवार एक एप्रिलचा दिवस मोठा राजकीय भूकंप आणणारा ठरला. एकीकडे भाजप-शिवसेनेकडून अधिकृत उमेदवारी विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांना जाहीर झालेली असतानाही भाजप नेते तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. खरेतर हा विजयराज शिंदे यांचा उमेदवारी अर्ज हा जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांच्या भावनांचा झालेला प्रचंड मोठा स्फोट आहे. कारण त्यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या मिरवणुकीत मोठ्या संख्येने भाजपचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. प्रतापराव यांनी आजवर केलेल्या राजकारणाचे वासे आता फिरू लागल्याचे या निमित्ताने बोलले जात आहे. दुसरीकडे विजयराज यांचा अर्ज म्हणजे प्रतापरावांसाठी धोक्याची घंटा आहे, हे निश्चित. गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्ह्यातील भाजपचे कार्यकर्ते या वेळी तरी कमीत कमी लोकसभेची जागा भाजपने लढवावी, अशी जोरदार मागणी पक्षश्रेष्ठींकडे करीत होते. कार्यकर्त्यांच्या या तीव्र भावना पाहून भाजप नेतृत्वानेही बुलढाण्याची जागा शिवसेनेकडून घेण्यासाठी हालचाली केल्या. १५ वर्षे ज्या प्रतापरावांना निवडून आणण्यासाठी जिवाचे रान केले. त्यांनी सातत्याने उपेक्षाच केली, त्यामुळे आता खऱ्या अर्थाने जिल्ह्याचा विकास करणारा व कार्यकर्त्यांना सांभाळून घेणारा लोकप्रतिनिधी असावा, अशी भाजप कार्यकर्त्यांची अपेक्षा होती. मात्र, ऐन वेळी प्रतापरावांची उमेदवारी घोषित झाली आणि जिल्ह्यातील भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांचा चांगलाच हिरमोड झाला. एकीकडे कार्यकर्ते प्रतापरावांच्या उमेदवारीला विरोध करीत होते, तर दुसरीकडे भाजपचेच काही आमदार हे प्रतापरावांचे समर्थन करीत होते. यावरून एक स्पष्ट आहे की, भाजपचे हे लोकप्रतिनिधी आपल्याच कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना समजून घेण्यात कोठेतरी कमी पडलेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजपच्या वतीने लोकसभा मतदारसंघात जे सर्वेक्षण केले होते, त्यात प्रतापरावांच्या उमेदवारीविषयी अत्यंत प्रतिकूल मत व्यक्त करण्यात आले होते. याचा अर्थ प्रतापरांना यंदा ॲन्टी इन्कम्बन्सीमुळे तिकीट मिळणार नाही, अशी भाजप कार्यकर्त्यांना अपेक्षा होता. त्यामुळेच भाजप-शिवसेनेच्या वतीने उमेदवार देण्यासही विलंब लागत होता. दरम्यान, शिवसेनेच्या वतीने अचानक एक चाल खेळण्यात आली आणि शिवसेनेच्या वतीने आमदार संजय गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. हा अर्ज दाखल होताच सायंकाळी प्रतापरावांची उमेदवारी घोषित करण्यात आली. प्रतापराव-संजय गायकवाड यांच्या खेळीने भाजप पुरती गारद झाल्याचे पहायला मिळाले. याशिवाय भाजप कार्यकर्ते व प्रतापराव जाधव यांच्यातील वादाला आणखी एका ठिकाणी ठिणगी पडली. प्रतापरावांच्या वतीने जिल्ह्यात विविध ठिकाणी संवाद मेळावे घेतले. या संवाद मेळाव्यांना भाजपचे लोकसभा मतदारसंघ प्रमुख विजयराज शिंदे यांच्यासह चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले तसेच आणखी काही भाजप पदाधिकाऱ्यांना जाणुनबुजून डावलण्यात आले. या घटनेमुळे तर भाजपचे कार्यकर्ते आणखीनच संतप्त झाले. त्या संतापातूनच कदाचित विजयराज शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असण्याची शक्यता आहे. विजयराज शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्याला काही ऐतिहासिक राजकीय संदर्भ देखील आहेत. विजयराज शिंदे हे प्रतापराव आणि संजय गायकवाड यांच्या राजकारणापासून फारकत घेऊनच दूर गेले होते. या वेळी विजयराज शिंदे यांनी प्रतापराव आणि संजय गायकवाड यांना खिंडीत गाठण्याचा प्रयत्न केलेला दिसतेय. विजयराज शिंदे हे जेंव्हा उमेदवारी अर्ज दाखल करायला गेले, त्या वेळी भाजपचे जेष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने त्यांच्यासोबत होते. खरे तर भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी आपल्या कार्यकर्त्यांच्या तीव्र भावनांचा आदर करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी तसे न करता या ठिकाणी प्रस्थापितांनाच उमेदवारी देण्याचे काम केले आणि नेमके येथेच भाजप बॅकफूटवर गेली. ज्याप्रमाणे उमेदवारी अर्ज दाखल करून गायकवाड यांनी एक राजकीय खेळी केली होती, तशीच राजकीय खेळ विजयराज शिंदेही करणार की आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवून व निवडणूक लढवत प्रतापरावांसमोर आव्हान निर्माण करणार, हे येत्या काही दिवसांमध्ये स्पष्ट होईलच. परंतु विजयराज शिंदे यांच्या उमेदवारी अर्जामुळे प्रतापराव समर्थकांमध्ये धडकी भरली गेली असणार, यात काहीच शंका नाही. विजयराज शिंदे यांच्या उमेदवारी अर्जामुळे लोकसभा निवडणुकीत आणखी रंग चढला असून, ही निवडणूक तिरंगी-चौरंगी अशी झाली तर मतविभाजनाचा नेमका फायदा कोणाला होणार, हे सध्यातरी सांगणे कठीण झाले आहे. काहीही असले तरी ही निवडणूक प्रतापरावांसाठी प्रचंड मोठे आव्हान असणार आहे. गेल्या १५ वर्षात मित्रपक्ष भारतीय जनता पक्षाला जर योग्य तो सन्मान दिला असता, तर आज प्रतापरावांवर ही वेळच आली नसती. त्यामुळे याचा कुठेतरी प्रतापरावांनी अंतर्मुख होऊन विचार करावा. दुसरीकडे भाजप पक्षश्रेष्ठींनीही आता गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.हिंगोलीमध्ये भाजपच्या विरोधानंतर शिवसेनेचा उमेदवार बदलण्याच्या जोरदार हालचाली होत आहेत या हालचाली यशस्वी होतील, अशी चिन्हेही आहेत. मग जे हिंगोलीत झाले ते बुलढाण्यात का होऊ शकत नाही, बुलडाणा येथील कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करून भाजपा पदाधिकारी व प्रस्थापित लोकप्रतिनधी रस्त्यावर उतरून आंदोलने करून ही जागा भाजपा करीता मागणार का असा प्रश्न बुलढाणेकर नागरिक उपस्थित करीत आहेत.



नामांकन देतांना विजयराज शिंदे सह भाजपाचे मान्यवर गण

### सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनलने फोडली भाजप कार्यकर्त्यांच्या भावनांना वाचा

**प्रतापरावांना उमेदवारी घोषित झाल्यानंतर भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संतापाची लहर पसरली होती. त्याआधीही बुलढाण्याची जागा भाजपनेच राखावी, अशी मागणी भाजप कार्यकर्त्यांची होती. भाजपच्या कार्यकर्त्यांच्या या भावनेला सर्वांत आधी वाचा फोडण्याचे काम सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने केले. भाजपमध्ये चाललेली ही मोहीम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजमुळे आणखी तीव्र झाली. विजयराज शिंदे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळी भाजप कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती हे त्याचे द्योतक आहे. आता भाजप पक्षश्रेष्ठी यासंदर्भात काय निर्णय घेतात, हे येणारा काळच आपल्याला दाखवणार आहे.**

# सर्वसामान्य जनतेचा उमेदवार रविकांत तुपकर आज दाखल करणार लोकसभेचा उमेदवारी अर्ज



**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे फायरब्रँड नेते रविकांत तुपकर हे बुलडाणा लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून २ एप्रिल रोजी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत व आशीर्वादाने ते आपला लोकसभा निवडणुकीतील उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. ही निवडणूक माझी एकट्याची नसून तमाम शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिक, तरुण आणि शहरातील बांधवांची ही लढाई आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी व आशीर्वाद देण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा, असे आवाहन रविकांत तुपकर यांनी केले आहे. रविकांत तुपकरांनी लोकाग्रहास्तव लोकसभा निवडणुक लढविण्याची घोषणा केल्यानंतर त्यांच्या सभांना जिल्हाभरात प्रचंड पाठिंबा मिळत आहे. लोक त्यांना निवडणूकीसाठी मोठ्या प्रमाणात लोकवर्गणीही देत आहे. सध्या ग्रामीण भागात व शहरी भागातही तुपकरांची लाट निर्माण झाल्याचे वास्तवदशी चित्र आहे. जनतेच्या पाठिंब्याने, आशीवादाने आणि सहकार्याने रविकांत तुपकर २ एप्रिल रोजी मंगळवारी आपला लोकसभेचा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. सर्व सामान्यांचा उमेदवार म्हणून आपण अर्ज दाखल करणार आहे. गेल्या २२ वर्षांपासून शेतकरी, कष्टकरी, तरुण व सर्वसामान्य नागरिकांसाठी लढा देत आहे. अनेक आंदोलने केली, तडीपार झालो, पोलिसांच्या लाठ्या-काठ्या खाल्ल्या, तुरुंगात गेलो आणि सर्वसामान्य, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुरांना न्याय मिळवून दिला. शहरी नागरिकांसाठी देखील वारंवार सत्याग्रह केला. माझा हा संघर्ष जर तुम्हाला वाया जाऊ देत नसेल तर स्वतःच्या खर्चाने, घरच्या भाकरी बांधून आशीर्वाद देण्यासाठी आणि अर्ज भरण्यासाठी मंगळवार २ एप्रिल रोजी बुलडाणा शहरातील जिजामाता प्रेक्षागार जवळील टिळक नाट्य मंदिराच्या खुल्या मैदानात सकाळी १०.०० वाजता हजारोंच्या संख्येने उपस्थित राहा, अशी विनंती रविकांत तुपकर यांनी केली आहे.

ग्रामीण व शहरी भागात सध्या रविकांत तुपकरांच्या नामांकन अर्ज दाखल करण्याचीच जय्यत तयारी सुरू असल्याचे चित्र आहे. गावगावचे तरुण गावातील प्रत्येक घरी जाऊन अगदी लग्नाच्या अक्षदा दिल्याप्रमाणे अर्ज दाखल करण्यासाठी बुलडाणा येण्याचे निमंत्रण देत आहेत. बुलडाणा चला हो, बुलडाणा चला... अशीच हाक सध्या प्रत्येक ठिकाणी दिसून येत आहे.

# काँग्रेस जिल्हाध्यक्षासह पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाची बँक खाते गोठवून त्यामधील रक्कम वळती करण्यात आली व काँग्रेसला मोठ्या प्रमाणावर दंड केल्याच्या घटनेचा निषेध म्हणून ३१ मार्च रोजी काँग्रेसने बुलढाण्यात आंदोलन केले होते. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आंदोलन, मोर्चा, निदर्शनास निर्बंध घातलेले असतानाही ही निदर्शने करण्यात आल्याप्रकरणी आचारसंहिता भंगाचा गुन्हा १ एप्रिल रोजी दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा येथील जयस्तंभ चौकात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या नेतृत्वात काँग्रेस कार्यकर्त्यांनी निदर्शने केली होती. सोबतच केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोर्चे आंदोलन, निदर्शनांवर ६ जुलैपर्यंत निबंध असतानादेखील हे आंदोलन करण्यात आले होते. त्यामुळे शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरण पोलिस कॉन्स्टेबल उमेश घुबे यांच्या तक्रारीवरून काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड शहर अध्यक्ष दत्ता काकस, लक्ष्मण घुमरे, संतोष आंबेकर, प्रकाश पाटील समाधान सुपेकर, बाळाभाऊ भोंडे मंगला पाटील, सय्यद इरफान, एकनाथ चव्हाण यांच्यासह इतर १० ते १५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांन सोमवारी दुपारी दिली.

# भटक्या, पाळीव प्राण्यांवर होणार मोफत उपचार

**जनसंचलन/बुलढाणा**

प्राणी मित्र बहुउद्देशीय संस्था यांच्या अंतर्गत भटक्या जनावरांच्या सेवेच्या केंद्राचे उद्घाटन गोपाल चिरानीया आणि नितीन परदेशी यांच्या हस्ते २९ मार्च रोजी करण्यात आले. चिखली रोड साखळी फाटा परदेशी यांच्या फार्ममध्ये आयोजित या केंद्रामध्ये भटक्या, पाळीव प्राण्यांचे उपचार करण्यात येणार आहेत. बऱ्याचदा रस्त्यावर पशु आडवे आल्याने त्यांना दुखापत होते. वेळेत उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यू होतो. रस्त्यावर अपघात झालेल्या पशुंना व पाळीव प्राण्यांना तत्काळ उपचार मिळावे, या हेतूने प्राणी मित्र बहुउद्देशीय संस्थेने पशु सेवा केंद्र सुरू केले आहे. या केंद्रात पाळीव तसेच वन्य प्राण्यांना निःशुल्क उपचार व सेवा दिल्या जाणार असल्याचे पशू केंद्राचे संचालक अविनाश मोरे यांनी माहिती दिली. भटके, प्राणी जखमी असेल, सांभाळ होत नसेल तर आमच्या केंद्रात त्यांना आणावे त्यांना मोफत उपचार दिल्या जातील. रोडवर भटक्या प्राण्यांचा किंवा वन्य प्राण्याचा अपघात झाल्यास हेल्पलाइन नंबर वर संपर्क करावा. आमची टीम येऊन त्यांना मदत करेल व आमच्या केंद्रात उपचाराकरता त्यांना घेऊन येईल, असे आवाहन शहर आणि नागरिकांना केले आहे. या उद्घाटनप्रसंगी पद्मा परदेशी, अंबादास घेवंदे, संजय मोरे, ममता ठाकूर, गजानन बुरकुल, बरखा बुरकुल, अशोक इंगोले उपस्थित होते.

# सातत्यपूर्ण निवडणूक शिक्षणासाठी जिल्ह्यात ५७ लोकशाही दालन

## बलशाली भारतासाठी युवकांमध्ये लोकशाही रूजविणे आवश्यक- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील...

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो, त्यामुळे सुदृढ लोकशाही व्यवस्थेत युवकांची महत्त्वपूर्ण भुमिका आहे. तसेच त्यांच्यामध्ये लोकशाही मुल्यांचा प्रचार-प्रसार करुन लोकशाहीबाबत जबाबदारी आणि जाणीव निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील ५७ वरिष्ठ महाविद्यालयात लोकशाही दालन स्थापन करण्यात आले आहेत. महाविद्यालयीन शिक्षणासोबतच युवकांमध्ये शाश्वत लोकशाहीचा संस्कार रुजविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. भारत हा लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे. एक सक्षम लोकशाही म्हणून विश्वस्तरावर भारताची विशेष ओळख आहे. लोकांनी लोकांचे व लोकांसाठी निवडुन दिलेले सरकार हे या देशातील राजकीय व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ग्रामपंचायतीपासून ते भारतीय संसदेपर्यत नियुक्त प्रतिनिधींना सार्वत्रिक निवडणुकीद्वारे राज्यकारभारासाठी निवडण्याचा जनतेला मौलिक अधिकार प्राप्त झाला आहे. दर पाच वर्षांनी प्रक्रियेद्वारे आपला प्रतिनिधी राजकीय व्यवस्थेत पाठविण्याचा जनतेला मुलभूत अधिकार प्राप्त झाला आहे. या अधिकारामुळे प्रत्येक मतदाराने मतदानाचे कर्तव्य पार पाडणे, हे सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक सुजान भारतीय नागरिकाची जबाबदारी आहे. त्यादृष्टीने जिल्हा प्रशासनातर्फे व्यापक मतदार जाणीव जागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जनजागृतीसाठी जिल्ह्यातील ५७ वरिष्ठ महाविद्यालयामध्ये लोकशाही दालन स्थापन करण्यात आले आहे. सदर दालनात मतदार नोंदणी प्रक्रिया,



मतदानाचा अधिकार, मतदाराचे कर्तव्य, यासोबतच संवैधानिक मूल्य अशा स्वरूपातील विविध दृकश्राव्य साहित्य साधने, भित्तीपत्रके, चित्र प्रदर्शनी, भारत निवडणूक आयोगाने मतदार जाणीव जागृतीसाठी प्रसिद्ध केलेले विविध साहित्याचा वापर करण्यात आला आहे. या माध्यमातून सातत्यपुर्ण निवडणूक प्रक्रिया आणि लोकशाही शिक्षण उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# ३५ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन/मोताळा**

एका ३५ वर्षीय युवकाने गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याची घटना १ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास येथील प्रभाग क्र. १० मध्ये उघडकीस आली. याप्रकरणी तक्रारीवरून बोराखेडी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तालुक्यातील चिंचपूर येथील रहिवासी व सध्या मोताळा येथे वास्तव्यास असलेला मंगेश बारसू गाडेकर (३५) या युवकाने १ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास येथील प्रभाग क्र. १० मध्ये स्वयंपाक घरात वायरच्या



साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी शे. सुलतान शे. नजीर यांनी बोराखेडी पोलिसात तक्रार दिली. त्यावरून प्रारंभिक तपासानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल सुपडासिंग चव्हाण हे करीत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# निवडणूक खर्चाचे लेखे तपासणीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलडाणा

बुलढाणा लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांनी त्यांचे खर्चविषयक लेखे तपासणी करणे आवश्यक आहे. या खर्च लेखे तपासणीला उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, सर्व उमेदवारांना त्यांचे निवडणूक खर्चाचे लेखे तपासणीकरीता वेळापत्रक जाहिर करण्यात आले आहे. त्यानुसार उमेदवारांना उपस्थित राहावे लागणार आहे. निवडणूक विषयक खर्च तपासण्यासाठी दि. १२ एप्रिल, दि. १८ एप्रिल, दि. २३ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात उपस्थित राहावे लागणार आहे. निवडणुकीतील उमेदवार निवडणूक खर्चाचे लेखी तपासणीकरिता सादर करणार नाहीत, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील ७७ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची सबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खर्च निरीक्षक अमित शर्मा संपर्क क्रमांक ८६२५९७६३७८ हे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लेखे तपासणीसाठी उपस्थित राहणार आहेत, असे नोडल अधिकारी खर्च नियंत्रण समिती तथा मुख्यलेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कळविले आहे.

# मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र ग्राह्य

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान करताना मतदान ओळखपत्र आवश्यक आहे. मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त मतदारांना ओळख पटविण्यासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र ग्राह्य मानण्यात येणार आहे.

मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात येते. ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करु शकत नसल्यास अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त नमूद कागपत्रे पुरावा म्हणून सादर करु शकतील, असे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहे.

या १२ पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक, पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांचेद्वारे नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपनी यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकालांगता प्रमाणपत्र ग्राह्य मानण्यात येणार आहे.

# शिक्षण व संस्कार हाच प्रगतीचा पाया- बळीराम गीते




जनसंचलन/बुलडाणा

आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून समाजाच्या सेवेसाठी तत्पर असण्याचा संस्कार, मेहनतीची तयारी व त्याला शिक्षणाची जोड दिल्यास कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होता येते, असे मत सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक बळीराम गीते यांनी येथे व्यक्त केले. येथील श्री. माऊली होमिओपॅथिक हॉस्पीटल व माऊली परीवाराच्यावतीने आरास ले आऊट येथे ३० मार्च रोजी बळीराम गीते यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार व ङ्कमाझा जीवन प्रवासङ्कङ्क या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला सौ. सुनीता बळीराम गीते, भगवानसिंग जाधव, सौ.उषाबाई जाधव, डॉ. दुर्गासिंग जाधव, डॉ. सौ. निलिमा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. माऊलींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. पुढे बोलताना बळीराम गीते म्हणाले, संतांनी सांगितलेली परमार्थाची शिकवण खऱ्या अर्थाने कोरोना काळात प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न करत असताना या जिल्ह्यातील अनेक सेवाव्रतींची ओळख झाली. त्यापैकीच डॉ. दुर्गासिंग जाधव एक होते. डॉक्टर्स शरीरातील रोगांवर आणि पोलिस समाजातील रोगांवर इलाज करतात. त्या दोघांनाही समाजाने समजून घ्यायला हवे असे सांगून नेहमी सकारात्मक रहा, असा संदेश गीते यांनी दिला. यावेळी श्री. माऊली हॉस्पीटलच्यावतीने बळीराम गीते व सौ. सुनीता गीते यांचा शाल श्रीफळ, माऊलींची प्रतिमा व साडीचोळी देवून जाधव परीवाराच्यावतीने सत्कार करण्यात आला. एमबीबीएस अंतीम परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या डॉ. मनाली राजेश हेलगे, डॉ. कौस्तुभ बळीराम गीते, डॉ. प्राजक्ता प्रतापसिंग पाटील, बी. एच. एम. एस. परीक्षेत साताऱ्याच्या महाविद्यालयातून प्रथम आलेल्या डॉ. श्वेता दिनेश राजपूत , तसेच एम. डी. (मेडिसिन) तृतीय वर्ष उत्तीर्ण केलेल्या डॉ. रुमिता गजानन पडघान यांचा मान्यवरांच्या हस्ते पालकांसह सत्कार करण्यात आला. यावेळी समाजसेविका व प्रसिध्द मानसोपचारतज्ज्ञ डॉ. सौ. लता बाहेकर यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दुर्गासिंग जाधव यांनी केले. सूत्रसंचालन शशिकांत इंगळे यांनी केले तर प्रा. शैलेश वारे यांनी आभार मानले. ॲड. सतीशचंद्र रोठे यांनी सत्कारमूर्तीचा परीचय दिला. कार्यक्रमाला मुख्यत्यारसिंग राजपूत, डॉ. गजानन पडघान, डॉ. सौ. वैशाली पडघान, डॉ. सागर जोशी डॉ.सौ. दिपाली जोशी, डॉ.सौ सुषमा हेलगे, डॉ. उदय इंगळे, डॉ.रामानंद इंगळे, पत्रकार राजेंद्र काळे, पत्रकार चंद्रकांत बर्दे, पत्रकार रणजितसिंह राजपूत , गजेंद्रसिंह राजपूत, विश्वनाथ माळी, अरुण दिवटे, प्रा. शैलेश वारे, प्रा. जीवनसिंग राजपूत, प्रा दिनेश कापुरे, गणेश काळुसे, इंजि.सुरेश चौधरी, राजेश हेलगे, दिनेशसिंग राजपूत, उमेशसिंग राजपूत, गणेशसिंग जाधव, सुनीलसिंग राजपूत ,प्रकाशसिंग राजपूत, सुभाषसिंग जाधव, गोपालसिंग राजपूत, गजानन इंगळे, डी. सी. तोमर, गणेश राऊत, मुन्नाभाऊ बेगानी,मुरली बत्रा, गिरीधर अग्रवाल, सौ. स्नेहलता अग्रवाल ,टीकमसेठ वाधवाणी, भाविका वाधवाणी, मोक्षिका वाधवाणी, सौ.ज्योती वाधवाणी, मनीषा वाधवानी, दिया वाधवाणी, सौ. स्वाती राजपूत ,सौ. पूनम राजपूत, सौ. सुनीता इंगळे, सौ. गायत्री काळे, सौ. सुरेखा काळुसे, नयन इंगळे, प्रदीप तोमर, ऋतुजा तोमर, माधुरी सोनवणे, प्रल्हाद केदार, प्रल्हाद काळुसे, स्वाती कापुरे , सुभाष जाधव, वसंतराव जोशी, गजेंद्रसिंग अवचार, सौ. रेखा इंगळे, सांची इंगळे, रमेश पालकर, रमाकांत कमळकर, संतोष सपकाळ, रवी भोंडे, सौरभ काळे, सृजन इंगळे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी शेवाळे, ज्ञानेश्वर पवार, प्रेमसिंग मोरे ,रामेश्वर सोळंकी, गौरव सोलंकी, किरण शिंदे, तुषार गाडेकर, शेख रियाज भाई आदींनी परिश्रम घेतले.

# दिव्यांग केंद्र स्थापन करण्यासाठी प्रस्ताव आमंत्रित...

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यात दिव्यांग केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. सदर केंद्र स्थापन करण्यासाठी दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्याल दिव्यांग कल्याण व पुनर्वसन केंद्र स्थापन करावयाचे आहे. त्यानुषंगाने दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्याचे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व पुरेशी जागा व इमारत, आर्थिकदृष्ट्या सक्षम, कामाचा अनुभव, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, थेरपीची सुविधा आदी सोयीसुविधा असलेल्या स्वयंसेवी संस्थांकडून केंद्र शासनाच्या अनुदान धोरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून दिव्यांग कल्याण व पुनर्वसन केंद्र स्थापन करण्याकरीता प्रस्ताव मागविण्यात आले आहे. जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांनी अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेल्यास परीपूर्ण प्रस्ताव दि. १५ एप्रिल २०२४ पर्यत जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा येथे विहित मुदतीत सादर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मलकापुरात गुटख्यासह ७.५० लाखांचा ऐवज जप्त...

जनसंचलन/मलकापूर

शहर पोलिस स्टेशनच्या पथकाने रात्रीच्या सुमारास नाकाबंदी व कोम्बिंग ऑपरेशन सुरू असताना तीन लाख रुपयांच्या मुद्देमालासह अंदाजे साडेचार लाख रुपयांचा गुटखा पकडला. यात एका आरोपीला ताब्यात घेतले असून दोन आरोपी फरार आहेत. मलकापूर शहर पोलिस स्टेशनच्या वतीने धरणगाव ते मलकापूर तहसील चौकात नाकाबंदी तसेच कोम्बिंग ऑपरेशन सुरू होते. मलकापूर शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अनिल गोपाल यांना मिळालेल्या




माहितीवरून पोलिस स्टेशनच्या डीबी पथकाने सापडा रचत एमएच ४३ एएफ ६५६२ वाहन पकडले. या वाहनाची झडती घेतली असता यात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आढळून आला. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी आरोपी चालक शेख यासीन शेख रहमान याला ताब्यात घेतले असून साजिद खान चांद खान ( कॅप्टन), इरफान खान रहमान खान ऊर्फ बाबू खान हे फरार झाले. मलकापूर शहर पोलिसांनी या तीनही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# रत्नागिरी देतो, पण ठाणे किंवा कल्याण हवं भाजपची शिंदेंना अट?

## होमग्राऊण्ड देणार की लेकाची सीट?

वृत्तसंस्था/ठाणे

महायुतीतील जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. रत्नागिरी-सिंधुदुर्गची जागा शिवसेनेसाठी सोडण्याची तयारी दाखवणाऱ्या भाजपने ठाणे किंवा कल्याण यापैकी एक जागा आपल्याला मिळावी, असा आग्रह धरल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. तर ठाणे किंवा कल्याण लोकसभेची मागणी भाजपने केली असली, तरी कल्याणमध्ये विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे यांनी निवडणुकीची तयारी सुरु केली आह. २०१९ च्या युतीतील जागावाटपानुसार रत्नागिरी-सिंधुदुर्ग ही जागा शिवसेनेकडे असल्याने येथून उद्योगमंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत यांना उमेदवारी मिळावी, असा शिंदेंच्या शिवसेनेचा आग्रह होता. त्यामुळे आतापर्यंत या जागेवरील उमेदवाराची घोषणा होत नव्हती. आधी या जागेवर डोळा असलेल्या भाजपने अखेर ती शिवसेनेला सोडण्याची तयारी दर्शवल्याची चर्चा आहे. मात्र या बदल्यात ठाणे किंवा कल्याणपैकी एक मतदारसंघ सोडा, अशी अट भाजपने ठेवल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.दुसरीकडे कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कल्याण लोकसभेत पदाधिकाऱ्यांच्या बैठका घ्यायला सुरुवात केली आहे.



डोंबिवलीमध्ये सोमवारी रात्री शिवसेना पक्षाचा संवाद मेळावा पार पडला. यावेळी खासदार शिंदे यांनी सांगितले की मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या शहरात विविध विकास प्रकल्प मार्गी लागले असून अनेक जनहिताची कामे प्रगतीपथावर आहेत. या सर्व कामांसाठी आपल्याला भरघोस निधी उपलब्ध झाला आहे. ही सर्व विकासकामे आपल्याला सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवायची आहेत.लोकसभा निवडणुकीमध्ये सोशल मीडियाचाही महत्त्वाचा वाटा असणार आहे. त्यामुळे आपण सर्वांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या मतदारसंघात झालेली विकासकामे लोकांपर्यंत पोहाचवा, असे आवाहन डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना केले.

तसेच खासदार शिंदे यांनी डोंबिवली आणि कल्याण ग्रामीण मधील विविध मान्यवरांची भेटी घेतल्या, त्यामुळे खा. डॉ. शिंदे यांनी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरु केल्याचे दिसून येत आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ठाणे लोकसभा मतदारसंघावर भाजपकडून दावा करण्यात येत असतानाच, सोमवारी नवी मुंबईतील शिवसेनेच्या शिबिरातही पदाधिकाऱ्यांनी या मतदारसंघाच्या जागेवर दावा केला. कोणताही उमेदवार द्या पण तो शिवसेनेचाच असावा, असा सूर सर्वच पदाधिकाऱ्यांनी लावत याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रह धरण्याची भूमिका जाहीर केली. यामुळे या जागेचा तिढा कायम असल्याचे चित्र आहे.

# कारकीर्द पणाला लावून खासदार शिंदेंसोबत!

## भाजप, राष्ट्रवादीमुळे सेनेत अस्वस्थता, महायुतीत कोंडी

वृत्तसंस्था/मुंबई

महायुतीमधील जागावाटप अद्याप मार्गी लागलेलं नाही. भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्यात जागावाटपावरुन एकमत झालेलं नाही. नाशिक, धाराशिवच्या जागेवरुन शिवसेना, राष्ट्रवादीत रस्सीखेच सुरू आहे. तर भाजपला साताऱ्याची जागा हवी आहे. या मतदारसंघात सध्या राष्ट्रवादीचा खासदार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेंची पत्रकार परिषद होणार होती. मात्र ती शेवटच्या मिनिटाला रद्द करण्यात आली. तटकरे पत्रकार परिषदेच्या माध्यमातून जागावाटपाबद्दल घोषणा करतील अशी शक्यता वर्तवली जात होती. भाजप आणि राष्ट्रवादी जागावाटपात दबावाचं राजकारण करत असल्याचा आरोप शिंदे गटाचे नेते करत आहेत.साताऱ्याची जागा भाजपच्या उदयनराजे भोसलेंना सोडण्याची तयारी राष्ट्रवादीनं दर्शवली. पण त्याबदल्यात त्यांनी नाशिकची मागणी केली. पण नाशिकची जागा शिवसेनेकडे आहे. हेमंत गोडसे इथले खासदार आहे. भाजपला जागा सोडण्याच्या बदल्यात अजित पवार गट शिवसेनेची जागा मागत असल्यानं शिंदे गटात नाराजी आहेराष्ट्रवादीनं नाशिकसोबतच धाराशिव मतदारसंघावरही दावा सांगितला आहे. हा मतदारसंघही शिवसेनेकडे राहिला आहे.



कित्येक वर्षे युतीत शिवसेना या जागेवरुन लढत आली आहे. आता या जागेवर राष्ट्रवादी दावा सांगत असल्यानं शिंदेसेनेत अस्वस्थतता आहे. माजी मंत्री सुरेश नवलेंनी ही अस्वस्थतता बोलून दाखवली. दबावाचं राजकारण करणाऱ्या भाजपला त्यांनी खडे बोल सुनावले.भाजपकडून दबावतंत्राचा वापर होतोय. ते आम्ही सहन करणार नाही. पक्षात फूट पडल्यानंतर खासदारांनी एकनाथ शिंदेंना साथ दिली. त्यांनी त्यांची कारकीर्द पणाला लावली. आता त्यांनाच अडचणीचा प्रयत्न होतोय. हे आम्ही सहन करणार नाही. याचे पडसाद उमटू शकतात, असा इशारा नवलेंनी दिला आहे.अधिकाधिक मताधिक्क्य मिळवू शकेल अशा उमेदवारांचा शोध सुरू असल्यानं, त्यासाठी बैठका होत असल्यानं जागावाटपासाठी वेळ लागत असल्याचं मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी सांगितलं. तीन पक्षांमध्ये कोणतेही मतभेद नसल्याची पुस्ती त्यांनी जोडली..

# भाजपच्या निलंबित केलेल्या तालुकाध्यक्षाचा मनमानी कारभार सुरूच!...

## निलंबन केले असतांनाही युतीचा नामांकन भरण्यासाठी सोशल वर केले कार्यकर्त्यांना आव्हान

### आदरणीय बंधू पितृतुल्य आमदार संजय कुटे यांनी सोशलवर व्हायरल केलेल्या पोस्ट चे उत्तर द्यावे मेहकर तालुकाध्यक्ष कोण-तालुकाध्यक्ष सारंग माळेकर

जनसंचलन/मेहकर

भाजप तालुका अध्यक्ष शिव ठाकरे यांना निलंबित केले असून त्यांच्या जागी मेहकर तालुका अध्यक्ष म्हणून सारंग प्रकाश माळेकर यांची नियुक्ती करण्यात आली मात्र भाजपचे निलंबित केलेले तालुकाध्यक्ष शिव ठाकरे हे आपली मनमानी करत असल्याचे दिसून येत आहे निलंबित झाले असताना सुद्धा सोशल मीडियावर तालुका अध्यक्ष या पदावर असल्याची व पक्षाची व कार्यकर्त्यांची दिशाभूल करणारी पोस्ट ते टाकत आहे. अशा प्रकारच्या पोस्ट व्हायरल करून निलंबित झालेले तालुकाध्यक्ष शिव ठाकरे हे शिस्त मोडत आहे व काही वरिष्ठ त्यांना पाठबळ देत असल्यामुळे कार्यकर्त्यांचा रोष वाढला आहे. याप्रकरणी पितृतुल्य आमदार संजय कुटे यांच्याकडे पदाधिकारी व काही कार्यकर्ते यांनी तक्रारी दिल्या आहे. निलंबित झालेले तालुका अध्यक्ष शिव ठाकरे यांनी सोशल मीडियावर प्रतापराव जाधव हे आज अर्ज भरत आहे तरी भाजपच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे अशी पोस्ट व्हायरल केली. कुठलेही पद नसताना अशी पोस्ट वायरल करून एक प्रकारे पक्षाची शिस्त मोडली असल्याचे कार्यकर्ते यांचा रोष आहे त्यामुळे लवकरात लवकर योग्य ती कारवाई करण्यात यावी. वरिष्ठांकडे वारंवार तक्रारी करून सुद्धा त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई होत नाही त्यांना एक प्रकारे वरिष्ठ पाठबळ देत असल्याचे कार्यकर्ते



यांचं म्हणणं आहे असेच सुरू राहिल्यास भारतीय जनता पार्टीचे सर्वसाधारण कार्यकर्ते व पदाधिकारी राजीनामा देऊन सदर होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा सुद्धा देण्यात आला आहे त्यामुळे वरिष्ठांनी याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यात यावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958